जाहीरात दिनांक १९/०३ /२०२४.

**महाराष्ट्र शासन**
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक यांचे कार्यालय**
**शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामाकरीता घेण्यासाठी जाहीरात (विधी सल्लागार- ०१ पद)**

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२७१५/प्र.क्र. १००/१३, दिनांक- १७/१२/२०१६ चे अनुषंगाने नाशिक व धुळे वनवृत्तांतर्गत सर्व वनविभाग तसेच वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक , वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, नाशिक वनवृत्तांतर्गत वनविभागातील जमीनविषयक, वनगुन्हे, आस्थापनाविषयक तसेच रोजंदारी मजूरांचे न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन केस मध्ये दाखल करावयाचे उत्तराचे प्रारूप तयार करणे तसेच अपिल प्रस्ताव तयार करणे न्यायालयीन प्रकरणाचा तातडीने पाठपुरावा करुन निपटारा करण्यासाठी तसेच इतर विवक्षित सेवा / कामांसाठी एमपॅनलमेंट (Empanelment) करुन सेवानिवृत्त अधिकारी ज्यांना विधी विषयक कामकाजाचा अनुभव आहे त्यांनी दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती पूर्णकरीत असलेल्या इच्छुक व पात्र, सेवानिवृत्त अधिकारी **ज्यांच्या सेवा निवृत्तीच्या वेळेसच्या वेतन चिठ्ठीत ग्रेड पे चा उल्लेख आहे** यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

वरील कामाकरिता इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी ज्यांना विधी विषयक कामकाजाचा अनुभव आहे यांना कामाचे आवश्यकतेनुसार सेवाकरार पध्दतीने प्रथमतः १ वर्षाकरीता घेण्यात येईल व आवश्यकतेप्रमाणे काम समाधानकारक वाटल्यास सदर करार कालावधी वाढविण्यात येईल. मात्र असा कालावधी एकूण ३ वर्षापेक्षा जास्त असणार नाही. उक्त शासन निर्णयाची प्रत www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१६१२१७१२१८२४१३०७ असा आहे.

**सेवा करार पध्दतीने भरावयाची पदसंक्या**

| अ.क्र. | पदाचे नाव | संख्या | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १. | विधी सल्लागार | ०१ | नाशिक व धुळे वनवृत्तांतर्गत सर्व वनविभाग कार्यालये तसेच वनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक, वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, नाशिक या विभागांतील जमीन विषयक, वनगुन्हे, आस्थापना विषयक, तसेच रोजंदारी मजूरांचे न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणांमध्ये दाखल करावयाचे उत्तराचे प्रारूप तयार करणे, अपिल प्रस्ताव तयार करणे तसेच न्यायालयीन प्रकरणाचा पाठपुरावा करणे. |

**१ ) अर्हता व अनुभव :-**

१. उमेदवार विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव असणे बंधनकारक आहे.

२. उमेदवारास मराठी, इंग्रजी व हिंदी भाषांचे पुरेसे ज्ञान असावे.

३. करार पध्दतीने नियुक्ती करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी शारीरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांचेकडे आवश्यक क्षमता असावी.

४. करार पध्दतीने नियुक्ती करावयाच्या सेवानिवृत्ती अधिकारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अश्या चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. याबाबत उमेदवारानी अर्ज करतेवेळी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

**२) कर्तव्ये व जबाबदा-या :-**

१. संबंधित वन विभागाकडून विधी विषयक सल्ला देण्याबाबत लेखी स्वरुपात पत्र प्राप्त झाल्यावर त्यांना लेखी स्वरुपात सल्ला देणे.

२. वनविभागांच्या न्यायालयीन प्रकरणांचा आढावा व पाठपुरावा करणे .

३. वनविभागांच्या वतीने न्यायालयात दाखल करावयाचे प्रतिज्ञापत्र, परिच्छेदनिहाय उत्तर तयार करणे व कायदे विषयक सल्ला देणे.

४. वनविभागाशी निगडीत असलेल्या व वनविभागाने दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणात आरोपींच्या वतीने कोणत्याही प्रकरणी खाजगी वकील पत्र घेता येणार नाही.

५. विभागाकडून दाखल करावयाचे याचिकांचे परिच्छेदनिहाय अभिप्राय / शपथपत्राचे प्रारुप हे कायदेशिरदृष्टया बरोबर आहे किंवा कसे, याबाबत संबंधित वन अधिका-याकडुन संदर्भ प्राप्त झाल्यावर संबंधित वन अधिका-यांनी तयार केलेल्या प्रारुपाची छाननी / तपासणी करुन आवश्यकतेनुसार सुधारणा करणे.

६. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित पार पाडणे.

७. न्यायालयीन प्रकरणांसाठी वृत्तस्तरावर नोडल ऑफिसर म्हणून काम पहाणे.

८. उमेदवाराचे मुख्यालय नाशिक येथे राहील. त्यांना सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत मुख्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

९. कार्यालयीन कर्मचा-याची लेखनीक म्हणुन किंवा टंकलेखनासाठी मदत घेता येणार नाही तसेच नियुक्त उमेदवार यांना ठरवून दिलेल्या मानधना व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारच्या सुविधा जसे शासकीय वाहन, वाहन भत्ता, प्रवासभत्ता, टंकलेखन सामग्री अनुदान, अथवा इतर तद्अनुषंगीक लाभ देय राहणार नाहीत.

**३) नियुक्तीचा कालावधी :-**

प्रथम नियुक्ती ११ महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरुपात राहील. करार पध्दतीने नियुक्त केलेल्या अधिका-यांचे काम समाधानकारक आढळुन आल्यास पुढील कालावधीकरीता अटी व शर्ती न बदलता नियुक्ती कालावधी वाढविण्यात येईल. हा कालावधी ३ वर्षापेक्षा जास्त नसेल. काम समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास नियुक्तीचा कालावधी कमी देखिल करण्यात येईल तसेच कोणतीही पूर्व सुचना न देता कोणत्याही क्षणी नियुक्ती संपुष्ठात आणण्याचे सर्व अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना असतील.

**४) इतर अटी व शर्ती :-**

अ) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावुन घेण्याचे व नियमित सेवेच इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

ब) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. त्याकरीता कोणतीही पूर्व सूचना दिली जाणार नाही.

क) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

ड) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

इ) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

फ) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन

कामाचे मुल्यमापन करतील. तसेच नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी प्रत्येक महिन्यात त्यांच्याकडे आलेल्या सर्व न्यायालयीन प्रकरणांचा मासिक प्रगती अहवाल नियुक्तीसाठी सक्षम असलेल्या प्राधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील.

ग) संगणकाचे ज्ञान असलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल

ह) प्राप्त झालेले अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचे तसेच सदर प्रक्रिया थांबविण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे.

ज्ञ) गट क व ड मधून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना अर्ज सादर करता येणार नाही.

**५) वेतन :-**सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-/प्र.क्र. १००/ १३, दिनांक १७/१२/२०१६ सोबतच्या परिशिष्ठ-अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे परिगणित करण्यात येईल.

६) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

७) निवड करण्यात येणा-या अधिका-यास / व्यक्तीस या कार्यालयाकडून निश्चित केलेल्या विहित नमुन्यात रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर बंधपत्र सादर करावे लागेल.

८) अर्जदाराने स्वहस्ताक्षरात लिहिलेला / टंकलिखित अर्ज (संपुर्ण माहिती असलेला जसे संपुर्ण नाव, जन्मतारीख, पत्ता, शिक्षण, अनुभव, काम केलेल्या विभागाचे नाव इत्यादी) दिनांक २१/०३/२०२३ ते ०२/०४/२०२३ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयाच्या पत्त्यावर पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात.

९) सोबत अर्जाचा नमुना जोडला आहे.

**अर्जदारासाठी इतर आवश्यक सुचना**

अ) ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते लिफाफ्यावर स्पष्ट नमूद करावे.

ब) निवड प्रक्रियेत अयशस्वी ठरलेल्या उमेदवाराबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

**(ऋषिकेश रंजन)**
**अध्यक्ष तथा मुख्य वनसंरक्षक**
**(प्रादेशिक) नाशिक**

# अर्जाचा नमुना

प्रति,

फोटो

विषय :-

संदर्भ :-

महोदय,

मी आपली संदर्भिय जाहिरात व संकेतस्थळावरील तपशिलवार जाहीरात वाचली असुन, माझा वैयक्तिक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. संपुर्ण नाव :-
2. जन्मतारीख अक्षरी व अंकी :-
3. ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नाव :-
4. संपुर्ण पत्ता व मोबाईल/संपर्क क्रमांक/इमेल आयडी :-
5. शैक्षणिक अर्हता :-

अ ( शैक्षणीक अर्हता :

.6 अनुभव -:

अचे वेळी धारण केलेले पदस सेवानिवृत्ती अधिकारी असल्यासेवानिवृत्त (

ब(वर्ष) एकुण सेवेचा कालावधी (

क चा दिनांकसेवानिवृत्ती (

ड पदाचा तपशिलसेवाकालावधीत कार्यरत असलेल्या (

| अ.क्र. | पदनाम | सेवाकालावधी | ठिकाण |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

८: इतर पुरवणी माहिती (

अर्जदाराची स्वाक्षरी व दिनांक

**प्रमाणपत्र**

करते /रे प्रमाणीत करतोमी याव्दा की, या अर्जामध्ये नमुद केलेली माझी माहिती ही पुर्णपणे खरी आहे .माहिती चुकीची अथवा खोटी आढळल्यास नेमणुकीचे प्रक्रियेमधुन वगळण्यास पात्र राहीन .आपण प्रसिद्ध केलेल्या जाहीरातीमधील नमुद केलेल्या शासन निर्णयातील अटी शर्तीचे वाचन केले असुन ते मला पुर्णपणे मान्य आहेत.

दिनांक : स्वाक्षरी -/
स्थळ :

शासकीय/ निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे ....

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७ डिसेंबर, २०१६

वाचा : शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. ८ जानेवारी, २०१६ व दि. २ मार्च, २०१६

**प्रस्तावना :-**

सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा विषयनिहाय एमपॅनलमेंट (Empanelment) करुन करार पद्धतीने घेण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला असून त्याबाबतचा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. ८.१.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. दि.२ मार्च २०१६ च्या शासन निर्णयानुसार पॅनलला (सूचीला) मान्यता देणे आणि नियुक्ती करणेबाबतचे अधिकार विभागप्रमुखांना प्रदान करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांस देण्यात आलेले आहेत.

उक्त शासन निर्णयातील तरतुदींनुसार कंत्राटी तत्वावर नेमण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या मासिक पारिश्रमिकाची परिगणना करताना अडचणी उद्भवत असल्याने त्यामध्ये योग्य ती सुधारणा करणे; त्याचप्रमाणे काही मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे यांना उक्त शासन निर्णयातील तरतूदी शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय -**

१. दि.८.१.२०१६ व दि. २.३.२०१६ हे दोन्ही शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून खालीलप्रमाणे सर्वसमावेशक निर्णय घेण्यात येत आहे.

२. प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील विविध विषयांसंदर्भात **"विवक्षित सेवा/कामांसाठी" विषयनिहाय एमपॅनलमेंट (Empanelment) करुन सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने उपलब्ध करुन घेता येतील. उदा.** आस्थापनाविषयक बाबी/ सेवाप्रवेश नियम, पायाभूत सुविधा निर्मिती, नागरी सेवा पुरविणे, विशेष गुप्त वार्ता, योजनांचे मूल्यमापन इत्यादी, *आवश्यकतेप्रमाणे इतर विवक्षित सेवा/कामांचा यामध्ये समावेश करता येईल.* त्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यपद्धती विहीत करण्यात येत आहे -

अ) निवडप्रक्रिया व नियुक्ती -

१) **नामिकासूची** (Panel) - करार पध्दतीने "विवक्षित कामांसाठी" नेमणूका करताना पारदर्शक पध्दतीचा अवलंब करण्यात यावा. विहीत पद्धतीने जाहिरात देऊन "विवक्षित कामांसाठी" पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात यावेत. जाहीरातीमध्ये नामिकासूचीत नियुक्त करावयाच्या एकूण व्यक्तिंची संख्या, विवक्षित कामाचे स्वरुप, कालावधी आणि देय मासिक पारिश्रामिक ( शासन निर्णयातील ड (१) (क) च्या अनुषंगाने)

यांचा उल्लेख करण्यात यावा आणि प्राप्त अर्जातून पात्र उमेदवाराची निवड करुन नामिकासूची (Panel) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांनी तयार करावी.

२) **नामिकासूचीची (Panel) वैधता** - सदर नामिकासूचीतील व्यक्तिंमधूनच करार पध्दतीने नियुक्ती करण्यात यावी. सदर नामिकासूचीची वैधता जास्तीत जास्त ३ वर्षे राहील तसेच त्या सूचीचा वार्षिक आढावा घेण्यात यावा.

३) **एमपॅनलमेंटचा कालावधी** - विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी सक्षम प्राधिकारी यांनी निश्चित करावा.

४) **बंधपत्र/हमीपत्र** - नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील या आशयाचे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्यांकडून घेण्यात यावे. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात, करार पद्धतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा, तसेच करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याचा उल्लेख करण्यात यावा.

५) **नियुक्ती आदेश** - नामिकासूचीतील व्यक्तीकडून बंधपत्र प्राप्त झाल्यानंतर करार पद्धतीने नियुक्ती देण्याबाबतच्या आदेशांमध्ये “एमपॅनलमेंटचा विषय”, “विवक्षित स्वरुपाचे काम” आणि ते काम पूर्ण करण्यासाठी अपेक्षित असलेल्या कालावधीचा स्पष्टपणे उल्लेख करुन सक्षम प्राधिकारी यांनी नियुक्ती आदेश काढावेत.

६) **करार पद्धतीने नियुक्ती द्यावयाच्या व्यक्तिंची संख्या** - करार पध्दतीने नियुक्ती देताना कार्यालयातील/आस्थापनेवरील एकूण मंजूर पदसंख्येच्या जास्तीत जास्त १० % इतके अधिकाऱ्यांना करार पद्धतीने नियुक्ती देता येईल. करार पद्धतीने नियुक्त्या करण्याचे प्रस्ताव तयार करताना कामाचे स्वरुप, आकस्मिकता, सार्वजनिक हित इ. बाबी विचारात घेण्यात याव्यात.

७) **करार पद्धतीने नियुक्तीची कालमर्यादा** - सदर कामासाठी करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात यावी. परंतु अशा नियुक्तीचे आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नूतनीकरण करता येईल. मात्र, एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

८) **वयोमर्यादा** - करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील. तथापि, ज्या व्यक्तिंच्या सेवा त्यानंतर चालू ठेवणे आवश्यक आहे, असे मत असेल त्यांच्या सेवा सक्षम प्राधिकाऱ्यास एकस्तर वरीष्ठ अधिकाऱ्याच्या/प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने पुढे चालू ठेवता येतील मात्र, कोणत्याही परिस्थितीत करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ७० व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

९) **सक्षम प्राधिकारी** -

(१) गट-अ (ग्रेड पे रु. ७६००/- किंवा अधिक) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्याचे अधिकार शासनास असतील.

(२) गट-अ ( ग्रेड पे रु. ७६००/- पेक्षा कमी) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्याचे अधिकार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम ९(२२) नुसार घोषित करण्यात आलेल्या विभाग प्रमुखांना (Head of the Department) असतील.

(३) गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) या संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्याचे अधिकार प्रादेशिक प्रमुखांना (Regional Heads) असतील.

(४) गट-क व गट-ड संवर्गातून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्यात येऊ नये.

**ब) अर्हता व अनुभव -**

१) विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव ही पूर्वअट ठेवण्यात यावी.

२) करार पद्धतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३) करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

**क) नियमित मंजूर पदे**

१) सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची करार (Contractual) पद्धतीने करण्यात येणारी नियुक्ती ही **नियमित** स्वरुपाच्या कामकाजासाठी न करता केवळ **विवक्षित** कामासाठीच करण्यात यावी.

२) नियमित मंजूर पदांवर (Sanctioned Posts) करार पद्धतीने नियुक्ती करता येणार नाही, अशी पदे सेवाप्रवेश नियमानुसार विहीत केलेल्या मार्गाने नियमितपणे भरण्यात यावीत.

३) करार पद्धतीने नियुक्तीमुळे शासन सेवेत असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या पदोन्नतीच्या संधीवर प्रतिकूल परिणाम होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

**ड) मासिक पारिश्रमिक व भत्ते -**

१) **मासिक पारिश्रमिक -**

(क) **शासकीय / निमशासकीय सेवा** - सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहीत कार्यपद्धतीचे पालन करुन करार पद्धतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे) कायम राहील.

*(तथापि, वेतनासाठी शासनाकडून अनुदान मिळत नसलेल्या शासकीय उपक्रम, महामंडळे, मंडळे, संविधिक संस्था यांच्याबाबतीत वरीलप्रमाणे निश्चित*

*होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाची रक्कम वाढविण्याचे अधिकार संबंधित शासकीय उपक्रम/ महामंडळे/ मंडळे यांच्या संचालक मंडळास आणि संविधिक संस्थेच्या प्रमुखास/अध्यक्षास राहतील.)*

(ख) **निवृत्तीवेतनार्ह नसलेल्या निमशासकीय सेवा** - ज्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा निवृत्तीवेतनार्ह नाहीत त्यांना करार पद्धतीने नियुक्त करताना, सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या वेतनाच्या आधारे त्यांची मानीव निवृत्तीवेतनाची रक्कम आणि त्यावर प्रचलित दराने महागाई भत्त्याची रक्कम केवळ हिशेबासाठी परिगणित करुन त्या आधारे त्यांचे मासिक पारिश्रमिक निश्चित करण्यात यावे.

२) **भत्ते** - उक्त तरतुदीनुसार निश्चित होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाच्या "जास्तीत जास्त २५ %" इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम "निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता" या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी/कर्मचारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ. बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात यावी.

*(मासिक पारिश्रमिक व भत्त्यांची परिगणना करण्याबाबतचे मार्गदर्शनपर उदाहरण या शासन निर्णया सोबतच्या "परिशिष्ट-अ" येथे उद्धृत करण्यात आली आहेत.)*

३) **प्रवासभत्ता व दैनिक भत्ता** - करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

४) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे अशा व्यक्तींना अनुज्ञेय होणाऱ्या पारिश्रमिकाचा कोणताही परिणाम त्यांना प्राप्त होणाऱ्या निवृत्तीवेतन व महागाई भत्ता यावर होणार नाही.

५) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तिंच्या पारिश्रमिकापोटी व भत्यांपोटी होणारा खर्च संबंधित कार्यालयाच्या "कार्यालयीन खर्च" या शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

**इ) इतर अटी व शर्ती -**

१) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे /सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क नसेल.

२) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

३) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

४) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

५) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

६) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळावेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

३. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

४. करार पध्दतीने नियुक्ती करताना सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता असणार नाही.

५. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त / स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांना कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ, पुनर्नियुक्ती देण्यात येऊ नये.

६. हा शासन निर्णय सर्व शासकीय कार्यालये, शासकीय उपक्रम, संविधिक संस्था, मंडळे/महामंडळे आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना लागू राहील.

७. शासन निर्णय दि. ०८.०१.२०१६ व दि. ०२.०३.२०१६ मधील तरतुदीनुसार करार पध्दतीने करण्यात आलेल्या नियुक्त्यांना देखील **या शासन निर्णयातील तरतूदी सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू होतील.**

८. हा शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्रमांक : अनौ. सं. क्र. ७७१/ १६/व्यय-४ दिनांक ३.१२.२०१६ नुसार दिलेल्या सहमतीन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१६१२१७१७१८२४१३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Mukesh Khullar

Digitally signed by Mukesh Khullar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6481e097db98eaae8b0580130544ebced12d1340cea24fcd0132235fb0c544a8, cn=Mukesh Khullar
Date: 2016.12.17 17:51:18 +05'30'

**( मुकेश खुल्लर )**
**प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग**

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई, (५ प्रती)
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, (५ प्रती)
३) सर्व.मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधान सभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) सर्व विधान सभा/विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ
६) मा.अध्यक्ष,महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
७) मा.सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
८) मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
९) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.

१०) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ,विधान भवन,मुंबई.
११) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१२) *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१३) *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई /नागपूर/औरंगाबाद खंडपीठ
१४) *प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१५) *राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१६) *सचिव, राज्य माहिती आयोग,मुंबई.
१७) *महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई
१९) विभागीय आयुक्त (सर्व)
२०) जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे)
२१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व)
२२) सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुख
२३) सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना)
२४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
२५) निवडनस्ती, कार्यासन-१३, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२

**पत्राने*

**शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. १७ डिसेंबर, २०१६ सोबतचे**

## परिशिष्ट-अ

## मासिक पारिश्रमिकाची व भत्त्यांची परिगणना करण्याबाबतचे उदाहरण

| मुद्दा | उदा. क्र. १ |
|---|---|
| निवृत्तीचा दिनांक | दि.३०.११.२०१३ |
| निश्चित झालेले मूळ निवृत्तीवेतन | रु.२५,३०० |
| अंशराशीकृत मुल्य | रु. १०,१२० |
| करार पद्धतीने नियुक्तीचा दिनांक | दि.१५.९.२०१६ |
| नियुक्तीच्या वेळी देय असलेल्या निवृत्तीवेतनाची रक्कम | रु.१५,१८० |
| नियुक्तीच्या वेळी प्राप्त होणाऱ्या निवृत्तीवेतनाची रक्कम + महागाई भत्ता | रु.१५,१८० + रु. ३१,६२५ (माहे नोव्हेंबर, २०१६ @ १२५%)<br>एकूण रु. ४६,८०५ |
| मासिक पारिश्रमिकाची रक्कम (शासकीय सेवा व निमशासकीय सेवा) | रु. ४६,८०० #<br>{शंभरात रुपांतरीत} |
| निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता" या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह कमाल अनुज्ञेय रक्कम (मासिक पारिश्रमिकाच्या २५ %) | रु. ११,७०० *<br>** जास्तीत जास्त* |
| एकूण | रु. ५८,५०० *<br>** जास्तीत जास्त* |

# तथापि, वेतनासाठी शासनाकडून अनुदान मिळत नसलेल्या शासकीय उपक्रम/ महामंडळे/ मंडळे/संविधिक संस्था यांच्याबाबतीत सदर पारिश्रमिकाची रक्कम वाढविण्याचे अधिकार संबंधित शासकीय उपक्रम/ महामंडळे/ मंडळे यांच्या संचालक मंडळास आणि संविधिक संस्थेच्या प्रमुखास/अध्यक्षास राहतील.

****